नियमित फौ.खटला क्र. ५०/२०१७
नि. क्र. २६ लगत

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ विनायक भिकाजी कानसे यांचा पुढील सरतपास विद्वान विशेष सहा.सरकारी विधीज्ञा कु. एस.आर.वनकर यांचेकडून शपथेवर पुढे सुरु –**

**०७.** काही अस्सल कागद रत्नागिरी येथील विशेष दिवाणी दावा क्रमांक ६७/२०१६ यामध्ये दाखल आहेत. ते दस्त मी याकामी हजर केलेले नाहीत.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम. एम. जाधव यांचेकडून –**

**०८.** मी इयत्ता बारावीपर्यत शिक्षण घेतलेले आहे. मी कळबंस्ते गावातील मळदेवाडी, ता. संगमेश्वर येथील कायमस्वरुपी रहिवासी आहे. मी पिग्मी एजंट म्हणून काम करीत होतो त्यामुळे मला बँकेतील व्यवहाराबाबत माहिती आहे. पिग्मी एजंट म्हणून माझे फारसे उत्पन्न नव्हते हे खरे आहे, साक्षीदार सांगतो की माझा उदरनिर्वाह भागेल एवढे उत्पन्न होते. हे म्हणणे खरे नाही की, पिग्मी एजंट म्हणून मला फारसे उत्पन्न मिळत नसल्यामुळे मी आंबा विक्रीचा व्यवसाय चालू करणार होतो. हे म्हणणे खरे नाही की, आंबा विक्रीचा व्यवसाय चालू करण्यासंबंधाने माझी आरोपी आनंद वेंगुर्लेकर यांच्याशी ओळख झाली. हे म्हणणे खरे नाही की, आनंद वेंगुर्लेकर व मी असे आमच्यात २०१४ साली आंबा बागे संदर्भात करार झाला होता. हे म्हणणे खरे नाही की ती बाग आनंद वेंगुर्लेकर यांनी इतर कोणाकडून तरी घेतली व ती बाग ते मला देत आहेत असे मला समजल्यावर मी तो व्यवहार रद्द केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आनंद वेंगुर्लेकर यांनी त्या करारापोटी माझ्याकडून रक्कम रुपये २,४०,०००/– स्वीकारली होती.

**०९.** हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला फिर्याद मध्ये नमुद रक्कम दिल्याबाबत धनादेश, डिमांड ड्राफ्ट किंवा पावती असा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी जोडलेला नाही.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, सरकारी पदभरतीसाठी ऑनलाईन किंवा इतर प्रकारे माहिती प्रसिध्द केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, पदभरतीसाठी ऑनलाईन अर्ज भरावा लागतो. त्याबाबत हॉलतिकीट आल्यानंतर परिक्षा घेतली जाते हे खरे आहे, साक्षीदार सांगतो की, आरोपीने माझे आयकार्ड व इतर कागद घेतले होते. मी ऑनलाईन अर्ज भरलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला सरकारी खात्याकडून त्याबाबत हॉलतिकीट किंवा ओळखपत्र आले

नाही, साक्षीदार सांगतो की आरोपीने मला सांगितले होते की तो स्वतः वर्क ऑर्डर घेवून येईल. हे म्हणणे खरे आहे की, महसूल कार्यालयात शिपाई भरतीबाबतची चौकशी त्या कार्यालयात जावून मी स्वतः केलेली नाही. आनंद वेंगुर्लेकर हे स्वतः हे काय काम करतात व महसूल खात्यात त्यांची किती वरपर्यंत ओळख आहे याबाबत मी स्वतः चौकशी केली नाही. मला तो नोकरीला लावेल असे आनंद वेंगुर्लेकर यांनी मला लिहून दिले नाही, हे खरे आहे, साक्षीदार सांगतो की माझ्याकडे त्याबाबतची रेकॉर्डींग आहे. मी तशी रेकॉर्डींग याकामी पोलीसांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमध्ये नमुद रक्कम मी कधीही आरोपीस दिलेली नाही. फिर्यादमध्ये आरोपीस दिलेली रक्कम जी नमुद आहे त्याबाबत माझ्याकडे कोणताही लेखी पुरावा नाही, या तुमच्या सूचनेबाबत माझे सांगणे की, आरोपीने त्याबाबत मला चेक दिले आहेत व माझ्याकडे रेकॉर्डींग आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते धनादेश मी पोलीसांना दिलेले नाहीत.

**११.** "मी सुरेश शिरगांवकर यांचेकडून सुध्दा पिग्मीची रक्कम गोळा करणेसाठी जात असे" हा मजकूर निशाणी २७ कडील माझ्या जबाबात नाही, हे खरे आहे.

**१२.** दिनांक ०८/१०/२०१४ रोजी मी आरोपी आनंद वेंगुर्लेकर याला माझे काका सोमा रत्ना कानसे यांचे समक्ष सुरेश शिरगावकर यांच्या दुकानाच्या बाजुला असलेल्या बागेत रक्कम रु.१,५०,०००/– रोख स्वरुपात दिले, याबाबत "त्या दुकानाच्या बाजुला असलेल्या बागेत ती रक्कम दिली" असा उल्लेख नि.२७ कडील फिर्यादमध्ये नाही, हे खरे आहे. हे म्हणणे खरे आहे की,"मी त्याला रक्कम दिल्यावर आरोपी हा माझ्या सोबत बँक ऑफ इंडिया शाखा कसबा इथपर्यंत आला. मी बँकेत गेलो नाही. मी बाहेर थांबलो. आरोपी बँकेत गेला व त्याने ती रक्कम तेथील त्याच्या खात्यात जमा केली" हा मजकूर नि. २७ कडील फिर्यादीमध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०/१०/२०१४ रोजी रक्कम रु.१,००,०००/– 'संगमेश्वर येथील बागेत रोख स्वरुपात दिले' असा उल्लेख निशाणी २७ कडील फिर्याद मध्ये नाही.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात आरोपीला ज्या रक्कमा दिल्या म्हणून मी सांगत आहे, ते सर्व खोटेच सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे चुलते सोमा रत्ना कानसे यांचे दागिने गहाण ठेवून रक्कम घेतल्याचे नि. २७ कडील फिर्यादीमध्ये नमुद नाही.

**१४.** "दिनांक २५/१०/२०१४ रोजी मी आरोपीला विचारल्यावरुन त्याने सांगितले की, तो माझा चुलत भाउ दिपक कृष्णा झिमण याला सुध्दा महसुल खात्यात शिपाई म्हणून नोकरी लावून देईन. दिपक कृष्णा झिमण हा माझा मानलेला चुलत भाउ आहे. मी त्याच दिवशी दिपक कृष्णा झिमण याला बोलावून घेतले. त्यावर तो आला. आरोपीने आम्हाला सांगितले की,

शंभर रुपये दाराच्या प्रत्येकी दोन मुद्रांक कागदावर तुम्हाला सहया दयाव्या लागतील. तो को–या बॉन्डवर सहया करण्यासाठी मला व दिपकला सांगत होता. मी त्याला म्हणालो की, याच्यावर मजकूर टाईप करुन घ्यावा, को–या बॉन्डवर सहया करणे नको. त्यावर तो म्हणाला की, त्याला लागलीच मुंबईला जायचे आहे, आम्ही त्या को–या बॉन्डवर सहया करण्यास त्याने सांगितले. त्यावरुन मी दोन को–या बॉन्डवर सहया केल्या. तसेच दिपक झिमण याने सुध्दा को–या बॉन्डवर सहया केल्या. मी त्याला हेही बोललो होतो की, को–या बॉन्डवर सहया करणे योग्य नाही. त्यावर तो म्हणाला होता की, तुमचे काम होणे आवश्यक आहे, त्यासाठी मला लगेच मुंबईला जायचे आहे. त्यामुळे आम्ही सहया केल्या होत्या. त्या बॉन्डचे पुढे काय झाले याबाबत मला आजपर्यंत समजलेले नाही” असा कोणताही मजकूर नि. २७ कडील फिर्यादमध्ये नमुद  नाही, हे म्हणणे खरे नाही, तसे नमुद आहे.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील परिच्छेद क्रमांक ४,५ व ६ मध्ये नमुद केलेला सर्व मजकूर खोटाच आहे.

**१६.** कर्ज प्रकरण करुन आरोपीस रक्कम दिली त्या कर्ज प्रकरणाबाबतचे काहीही कागदपत्रे मी पोलीसांना दिले नाहीत, साक्षीदार सांगतो की, पोलीसांकडून तपास झाला नाही, पोलीस माझ्याकडे आलेच नाहीत.

**१७.** दिपक कृष्णा झिमण याने स्वतः आरोपीविरुध्द तक्रार केलेली नाही, या तुमच्या सुचनेबाबत माझे सांगणे की, मी तक्रार केली आहे, त्यामुळे त्याने स्वतंत्र तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने दिपक कृष्णा झिमण याची फसवणूक केलेली नाही.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, आंबा विक्रीबाबतच्या करारासंबंधी मी रक्कम रुपये २,४०,०००/– आरोपीला दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी हमीपोटी आरोपीने मला तीन कोरे धनादेश स्वाक्षरी करुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या २,४०,०००/– रुपयांपैकी आरोपीने मला रक्कम रुपये १,००,०००/– परत केली आहे, साक्षीदार सांगतो की, त्याने रक्कम रुपये १५,६७,२००/– पैकी रक्कम रुपये १,००,०००/– परत केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी को–या धनादेशांचा वापर करुन आरोपीविरुध्द रक्कम वसुलीसाठी दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, खोटया रक्कमा फिर्यादीमध्ये नमुद करुन आरोपीकडून जास्तीची रक्कम उकळण्यासाठी मी आरोपीविरुध्द खोटीच केस केली आहे.

**१९.** धनादेश न वठल्याबाबतची कल्पना मी आरोपीस दिली होती. त्याबाबत मी आरोपीला नोटीस पाठविली नव्हती. धनादेश न वठल्याबाबत मी आरोपी विरुध्द फौजदारी फिर्याद

दाखल केली नाही, साक्षीदार सांगतो की, त्याने मला वेळच दिला नाही, तो मला पैसे देतो म्हणून सांगत होता, त्यातच तीन महिने गेले. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटीच केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमध्ये नमुद रक्कम आरोपीने माझ्याकडून स्विकारली असे मी खोटेच सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमध्ये नमुद रक्कम मला देणे आरोपी लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटया तारखा व रक्कमा नमुद केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्याकडून कधीही कोरे बॉन्ड घेतलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कधीही को–या बॉन्डवर माझ्या सहया घेतलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, महसूल खात्यात नोकरीस लावतो असे आरोपीने मला कधीही सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटेच सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.05.31 10:52:49 +0530

(ब. द. तारे)

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

ठिकाण – देवरुख

दिनांक – २९/०५/२०२४

## CERTIFICATE

RCC 50.2017

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | T.N.Khade (Jr. Clerk) |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 29/05/2024 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 29/05/2024 |
| Evidence uploaded on | : | 29/05/2024 |